**"मागेल त्याला शेततळे" योजनेअंतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये (TSP) लाभार्थी निवडीसाठी ठरवून दिलेली जमीन धारणेची अट शिथिल करणेबाबत.**

## महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग
शासन निर्णय क्र.शेततळे-२०१७/प्र.क्र.४४ /रोहयो-५
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक - २ ऑगस्ट, २०१७.

वाचा-

१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.शेततळे-२०१६/प्र.क्र.१(७४)/रोहयो-५, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६.

२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.शेततळे-२०१६/प्र.क्र.१(७४)/रोहयो-५, दिनांक १० ऑक्टोबर, २०१६.

३) शासन निर्णय क्र.शेततळे-२०१७/प्र.क्र. ११५ /रोहयो- ५ दि. २० मे, २०१७.

**प्रस्तावना -**

राज्यातील शेती उत्पादनामध्ये शाश्वतता आणण्यासाठी तसेच शेतक-यांसाठी संरक्षित व शाश्वत सिंचनाची सुविधा निर्माण करण्यासाठी राज्यात ५० पैसे पेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांमध्ये दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये "मागेल त्याला शेततळे" ही योजना सुरू करण्यात आली आहे. तसेच ५० पैसे आणेवारीची अट रद्द करून सदर योजना कोकण विभागासह संपूर्ण राज्यात दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. "मागेल त्याला शेततळे" या योजनेंतर्गत कोकण विभागासाठी सुधारीत आकारमानाच्या शेततळयास मान्यता देण्यासाठी व या योजनेंतर्गत ०.६० हेक्टर किमान धारण क्षेत्राची अट शिथिल करून ती ०.२० हेक्टर करण्यासाठी दि. २० मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

मा. मुख्यमंत्री महोदयांचे, अपर मुख्य सचिव यांच्या विधान भवनातील कक्षामध्ये दिनांक २० मे, २०१७ रोजी क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये (TSP) या योजनेची व्याप्ती वाढविण्यासाठी शेततळे लाभार्थी निवडीसाठी ठरवून दिलेली जमीन धारणेची मर्यादा कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावर संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे यांच्याकडून अभिप्राय प्राप्त झाले आहेत. त्यानुसार "मागेल त्याला शेततळे" या योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीच्या लाभार्थीसाठी किमान ०.६० हेक्टर जमीन धारण क्षेत्राची अट शिथिल करुन ती ०.४० हेक्टर केल्यास जास्तीत जास्त गरजू लाभार्थ्यांना या घटकाचा फायदा होणार आहे. सबब "मागेल त्याला शेततळे" योजनेची व्याप्ती वाढविण्यासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये (TSP) लाभार्थी निवडीसाठी ठरवून दिलेली जमीन धारणेची

अट शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

"मागेल त्याला शेततळे" या योजनेअंतर्गत राज्यातील लाभार्थी निवडीसाठी ठरवून दिलेली ०.६० हेक्टर जमीन धारणेची मर्यादा आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये (TSP) कमी करून ती ०.४० हेक्टर इतकी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णयास दि.१७ फेब्रुवारी, २०१६ व दि.१० ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१७०८०४११४१३१२११६ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

**( डॉ. प्रमोद शिंदे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (रोहयो), यांचे खाजगी सचिव
सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.विरोधी पक्षनेते,महाराष्ट्र विधानसभा
मा.विरोधी पक्षनेते,महाराष्ट्र विधानपरिषद
मा.समिती प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
मुख्य सचिव यांचे सहसचिव
सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व विभागीय कृषि सहसंचालक
सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे,/सर्व अधीक्षक अभियंता,लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर)
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय,मुंबई,/महासंचालक, माहिती व जनसंपर्क,मुंबई (प्रसिध्दीकरीता)
सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
सर्व उपायुक्त (विकास)
महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,

महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व उपसचिव/सर्व अवर सचिव व सर्व कार्यासन अधिकारी, रोहयो व सर्व मंत्रालयीन विभाग
निवडनस्ती रोहयो-५